जा. क्र. माध्य/१४/समाशा/पीआर/
शिक्षण/उप संचालक पुणे विभाग पुणे १
यांचे कार्यालय, पुणे दि. २९/९/८३

29 SEP 1983

प्रति - सेक्रेटरी
ज्ञान प्रबोधिनी पुणे.

विषय :- ज्ञान प्रबोधिनी या संस्थेच्या '' निगडी '' जिल्हा पुणे या माध्यमिक शाळेत मराठी माध्यमाचे समांतर वर्ग सुरु करण्यास परवानगी देण्या बाबत...

महाशय,

उपरोक्त विषयीचे शासनाचे पत्र क्रमांक ओस अेस अेस /७/८२/ ३२०५७/६६१ अेन ) मा शि / १ दि १ सप्टेंबर ८३ च्या पत्रानुसार '' ज्ञानप्रबोधिनी '' या संस्थेतर्फे सुरु असलेल्या ' निगडी ' या इंग्रजी माध्यमाच्या माध्यमीक शाळेत मराठी माध्यमाचे इयत्ता ५ वी ते ८ वी चे समांतर वर्ग कायम विना अनुदान तत्वावर पूर्वलक्षी प्रभावाने सन ८२ पासुन सुरु करण्या नेहमीच्या अटीवर ( कृपया शिक्षण संचालकांचे क्रमांक अशाशा/१०८०/३९४०४/१५ क दि २४/७/८० चे पत्र विचारांत घ्यावे ) तसेच विशेषतः खालील अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर परवानगी देण्यात येत आहे...

अ) संस्थेने इंग्रजी व मराठी माध्यमाच्या वर्गासाठी मुख्याध्यापक वगळुन वेगवेगळ्या स्वतंत्र शिक्षक वृंदाची व इतर शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची नेमणुक केली पाहीजे...

ब) मराठीच्या समांतर वर्गासाठी वेगळी वर्ग व्यवस्था असली पाहीजे.

क) संस्थेने मराठी माध्यमाच्या समांतर वर्गासाठी आवश्यक ती जागा/फर्निचर व इतर शैक्षणिक बाबींची पूर्तता केली पाहीजे...

ड) संस्थेने मराठी माध्यमाच्या समांतर वर्गाच्या दृष्टीने होणारा सर्वतोपरी व्यवहार (आर्थिक बाबी सह ) शक्यतो स्वतंत्र वेगळा ठेवावा.

) या मराठी माध्यमाच्या समांतर वर्गासाठी भविष्यात येणाऱ्या कोणत्याही प्रकारचे अनुदान तसेच कमी उत्पन्न गटातील पालकांच्या मुलांना मिळणाऱ्या फी सवलतीचा परतावा देण्यात येणार नाही...

१) संस्थेची आर्थिक स्थिती चांगली आहे याची खात्री संस्थेकडुन शासनाकडे अनुदानाची मागणी न करण्याची लेखी हमी घेण्यात यावी व त्यावर संस्थेच्या अध्यक्षांची व जबाबदार पदाधिकारी यांच्या सह्या घेउन ते हमी पत्र शिक्षणाधिकाऱ्यांच्या कायम स्वरुपात जतन करुन ठेवण्यात यावे.

२) संस्थेने या बाबत वेळोवेळी निघणाऱ्या शासकीय आदेशांचे ( उदा. विद्यार्थ्यांचे प्रवेश बाबत ) कटाक्षाने पालन करणे आवश्यक आहे. कृपया या पत्राची पोहोच द्यावी.

सही :- ( x x x )

( स्थळ प्रतीवर शिक्षण उप संचालक )
यांची स्वाक्षरी आहे...

शिक्षण संचालक पुणे विभाग पुणेकरिता

मा. प्राचार्य -

उपशिक्षणाधिकारी (३) जि.प. पुणे

श्री. हेवालदार / यांचेकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी.

सदरहू शाळेला भेट देवुन वरील अटींची पूर्तता केली आहे किंवा नाही याचा अहवाल - तसेच शाळेचा तपासणी अहवाल सात दिवसांचे आत इकडे पाठवावा व या बाबत विलंब झाल्यास शाळेची मान्यता चालू ठेवणे यास विलंब होईल याची नोंद घेवुन त्वरीत कार्यवाही करावी...

शिक्षणाधिकारी
पुणे जिल्हा परिषद पुणे.

प्रत - सेक्रेटरी, ज्ञान प्रबोधिनी पुणे-३० यांचेकडे माहीतीसाठी सादर....